4798

जाक्र/जिपऔ/बांध/नोंकावा/कावि/2018
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक :- 28/12/2018
1-1-2019

प्रति,

1) कार्यकारी अभियंता (बांध/लघु पाटबंधारे/ग्रामीण पाणी पुरवठा)

2) जिल्हा आरोग्य अधिकारी

3) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणी पुरवठा मिशन)

जिल्हा परिषद औरंगाबाद

**विषय :- सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांच्या वार्षिक आर्थिक व इतर मर्यादेपेक्षा अधिक काम न देणे बाबत.**

**संदर्भ :-** साप्ताहिक विधायक वरील बातमी दिनांक 03 डिसेंबर 2018 व दिनांक 24 डिसेंबर 2018.

वरील विषयी आपणास सुचित करण्यात येते की, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना 3.00 लक्ष पर्यंतची कामे कामवाटप संनियत्रण समिती मार्फत 33:33 प्रमाणे वाटप करण्यात येतात. तसेच 3.00 लक्ष वरील कामे ई-निविदेमार्फत 33:33 प्रमाणे आरक्षित कामे देण्यात येतात.

सदरील कामांच्या नोंदी संबंधित खात्याचे कार्यकारी अभियंता यांनी विहित पासबुकात घेणे अत्यावश्यक राहील, आणि त्या संस्थेच्या पासबुकातील नोंदी तपासुन एका वर्षात एकुण 50.00 लक्ष पेक्षा जास्त रक्कमेची कामे मजुर सहकारी संस्था यांना दिली जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. असे शासन निर्णय 19 ऑक्टोंबर 2011 तील 3.1.12 मध्ये स्पष्टपणे नमुद केलेले आहे.

तसेच 3.2.5 (अ) मध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी रुपये 5 लक्ष पर्यंतचे पहिले काम यशस्वीरित्या पूर्ण केलेले आहे अशाच सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना रुपये 15.00 लक्ष पर्यंतची कामे देण्यासाठी पात्र राहतील. अशा कामांची एकत्रित रक्कम रुपये 60.00 लक्ष प्रति वर्ष पाच वर्षापर्यंत इतकी राहील व तद्नंतर सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी नियमित कंत्राटदार म्हणून कार्यरत राहतील. अशा कामांची नोंद सबंधित खात्याच्या कार्यकारी अभियंता यांनी विहित पासबुकात घेणे आवश्यक राहील आणि सबंधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या पासबुकातील नोंदी तपासुन एका वर्षात रुपये 60.00 लक्ष पेक्षा जास्त रक्कमेची कामे दिली जाणार नाहीत याची दक्षता कार्यकारी अभियंत्यांनी कटाक्षाने घ्यावी. असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता सहकारी संस्था यांना वरील नियम 3.2.5 (अ) लागु राहील.

परंतु माझे असे निदर्शनास आले आहे की, वरील बाबीचे काटेकोर पालन करण्यात येत नाही. यापुढे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांच्या अदयावत नोंदी केलेल्या पासबुकाची तपासणी करुनच संबंधितास कामाचे आदेश देण्यात यावेत.

सही/-

**अध्यक्ष कामवाटप संनियत्रण समिती**
**तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद औरंगाबाद**

**प्रतिलिपी :-**

1) सर्व सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, दिनांक 01 एप्रिल 2018 पासुन अदयावत नोंदी केल्याशिवाय कामवाटप बैठकीत कामे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

2) आय.टी.कक्षास प्रसिध्दीस्तव.

**अध्यक्ष कामवाटप संनियत्रण समिती**
**तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद औरंगाबाद**